स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास व पंचायत राज विभाग**
७ वा मजला, बांधकाम भवन, मर्झबन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

Email ID :- maharddat75@gmail.com

जा.क्र./प्रआयो-२०२३/प्र.क्र.१४० /योजना-१०

दि. २५/०५/२०२३

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, ठाणे.

**विषय :- आझादी का अमृत महोत्सव २.० अंतर्गत 'समग्र आवास' अभियान राबविणेबाबत...**

संदर्भ :- मा.उप सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.File No.J-11060/11/2023-RH-Pol.(383898), दि.16.05.2023.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी, माहे डिसेंबर २०२२ मध्ये स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून 'आझादी का अमृत महोत्सव २.०' सुरु करण्यात आले असल्याबाबत कळविले आहे. या अभियानांतर्गत लोकांचा, संस्कृतीचा व कर्तृत्वाचा गौरवशाली इतिहास साजरे करण्याचा तसेच त्यांचे स्मरण करण्याचा उपक्रम दि.१५ ऑगस्ट २०२३ पर्यंत राबविण्यात येणार आहे. सदर अभियानाचा उद्देश, मा.पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या 'पंच प्राण' या उपक्रमाच्या अनुषंगाने सांस्कृतिक आणि सामाजिक विकासाच्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून लोकांच्या चळवळीला अधिक चालना देणे हा आहे.

'आझादी का अमृत महोत्सव २.०' अंतर्गत 'समावेशक विकास' या धोरणाच्या अनुषंगाने, 'समग्र आवास' हा एक महत्वाचा उपक्रम आहे. यामध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अभिसरण' याचा समावेश आहे. सदर अभियान देश व देशातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याकारणाने, माहे ऑगस्ट, २०२३ पर्यंत देशभरात जागरूकता निर्माण करण्यासाठी भागधारक, कार्यकर्ता, लाभार्थी, तज्ञ इत्यादींचा सहभाग घेण्याचे प्रस्तावित आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या संदर्भात, महाराष्ट्र राज्यात माहे मे/जून, २०२३ मध्ये ही मोहीम आयोजित करण्याबाबत व राज्याने प्रस्तावित कार्यक्रमाचे ठिकाण व तारीख निश्चित करणेबाबत, पत्रामध्ये अग्रेषित करण्यात आले आहे.

श्री.गया प्रसाद, उप महासंचालक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या निदेशानुसार सदर कार्यक्रम जिल्हा परिषद, ठाणे येथे आयोजित करावयाचा आहे.

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे आपण प्रस्तावित कार्यक्रमाचे ठिकाण व तारीख निश्चित करुन संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांना कळवावे. तसेच सदर कार्यक्रमामध्ये मा.राज्यमंत्री, पंचायती राज, भारत सरकार यांना आमंत्रित करुन इतर अनुषंगीक बाबींची व्यवस्था करावी.

सदर कार्यक्रमाकरीता होणारा खर्च जिल्हा स्तरावरील उपलब्ध प्रशासकीय निधी मधून करण्यात यावा.

**(राजेश कुमार, भा.प्र.से.)**
अतिरिक्त मुख्य सचिव,
ग्रामविकास व पंचायत राज विभाग

**प्रत**: संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई.

File No. J-11060/11/2023-RH-Pol. (383895)
Government of India
Ministry of Rural Development
Department of Rural Development
(Rural Housing Division)
******

Krishi Bhawan, New Delhi-110011
Dated the 15th May, 2023
16

To,

**The Additional Chief Secretary,**
Rural Development Department,
Government of Maharashtra – 400001

**Subject: Organizing Azadi ka Amrit Mahotsav 2.0: 'Samagra Awaas' campaign in Maharashtra- reg.**

Sir,

I am directed to inform that the Government of India launched **Azadi Ka Amrit Mahotsav 2.0**, an initiative to celebrate and commemorate 75 years of independence and the glorious history of its people, culture, and achievements in December 2022. The campaign ending on 15th August 2023 i.e a year post the 75th anniversary of independence, **Azadi Ka Amrit Mahotsav 2.0** aims to further boost peoples' movement by focusing on critical areas of cultural and social development aligning with the 'Panch Pran' announced by Hon'ble Prime Minister of India.

2. In this connection, it is informed that one of the campaigns under the theme 'Inclusive Development' of Azadi ka Amrit Mahotsav 2.0 is **'Samagra Awaas' - Convergence under Pradhan Mantri Awaas Yojana-Gramin.** As the campaign holds a crucial value for the country and its citizens, various events under this theme will be organized till August, 2023 across the country to ensure awareness, and participation by stakeholders, functionaries, beneficiaries, experts, etc.

3. As regards PMAY-G, it has been decided that the campaign may be organized in the State of Maharashtra in the month of May/June, 2023. Therefore, it is requested that the State may kindly furnish the **details of a suitable venue and proposed date for the launch of the campaign**.

4. Further, it is also informed that the expenditure for organizing the 'Samagra Awaas' campaign may be met from the scheme admin fund available with the State.

Yours faithfully

MVNVara Pd

**(M V N Vara Prasad)**
Under Secretary to Govt. of India
Email:prasad.vara@nic.in;

Copy to: The Director, PMAY-G, Govt. of Maharashtra: For information and necessary action.